## आपात्कालीन परिस्थितीमधील सामाजिक भान

# लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे

# रक्तदान शिबीर

सध्या कोविड-१९ (COVID-19) या कोरोना विषाणूची प्रचंड साथ जगभरात सुरु आहे. या विषाणूने अवघ्या हिंदुस्थानमध्ये दहशत पसरवलेली आहे. या विषाणू बाधितांची महाराष्ट्रातील संख्या एक गंभीर विषय बनला आहे. याची दखल घेत महाराष्ट्र राज्याचे लोक-कल्याणकारी शासनाचे मान.मुख्यमंत्री श्री.उध्दवजी ठाकरे महाराष्ट्रातील जनतेला धीर देत समस्त महाराष्ट्रातील नागरिकांच्या ठणठणीत व निरोगी आरोग्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. सुरक्षित व सुखरुप राहण्यासाठी जनतेला आवाहन करीत आहेत.

दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात शाळा व महाविद्यालयांना सुट्टया असल्यामुळे तसेच नित्य-नियमाने रक्तदान करणारे रक्तदाते बाहेरगावी गेल्यामुळे रक्ताचा राज्यात तुटवडा भासतो. महाराष्ट्रामध्ये दर दिवशी साधारणपणे ४५००-५००० रुग्णांना गंभीर आजाराच्या तातडीच्या शस्त्रक्रियेसाठी, अपघातग्रस्तांसाठी व थॅलेसिमिया - हिमोफिलिया या रक्ताच्या आजारग्रस्त रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी रक्ताची निकड भासते. सदर बाब विचारात घेता रक्तदात्यांची कोरोना विषाणू बाबतीची लक्षणे व प्रवासाचा पूर्व इतिहास तपासून व सुरक्षा, स्वच्छतेचे पालन करुन तसेच होणाऱ्या गर्दीचे व्यवस्थित सुनियोजन करुन लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडाळाने महाराष्ट्र राज्याचे मान.मुख्यमंत्री श्री.उध्दवजी ठाकरे आणि आरोग्यमंत्री मान.श्री.राजेश टोपे यांनी जनतेला रक्तदानाबाबत केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत. सोमवार दि.२३ मार्च २०२० पासून सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत लालबागचा राजा योग केंद्र, लालबागचा राजा मार्ग, लालबाग, मुंबई-१२ येथे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. महाराष्ट्र राज्याच्या राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या मान्यतेने आयोजित केलेल्या आणि एकूण दहा दिवसांचे नियोजन असलेल्या या रक्तदान शिबिरात सहभागी होणाऱ्या सर्व रक्तदात्यांची अत्यंत सुरक्षितपणे सर्व वैद्यकिय चाचणी करुन त्यांच्याकरवी रक्तदान करुन घेण्यात येईल. महाराष्ट्र शासनाने घालून दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करुन, कोणत्याही प्रकारची गर्दी होऊ न देण्याची काळजी घेऊन ह रक्तदान शिबिर यशस्वी करण्यात येईल.

रक्तदात्यांमध्ये रक्तदान करण्याविषयी भिती अथवा संभ्रम निर्माण झालेला आहे.परंतू रक्तदान हे गरजू रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. कारण सद्यस्थितीत रक्तास कुठलाही पर्याय उपलब्ध नाही. रक्तदान केल्यामुळे अथवा रक्त संक्रमणामुळे कोरोना विषाणूंची लागण होत नाही, असे तज्ञांचे मत आहे.

तरी इच्छुक रक्तदात्यांनी मंडळाने आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिरात रक्तदान करुन या उदात्त कार्यास अनमोल सहकार्य करावे आणि आपण सारेच जण कोरोनाच्या या लढाईत रक्तदानाचे पवित्र कार्य करुया असे आवाहन मंडळाचे मानद्‌सचिव श्री.सुधीर साळवी यांनी केले आहे.